## प्रेसनोट दिनांक १३/०७/२०१९

## उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे

**पोलीस ठाणे हद्दीतील उत्तमनगर शिवणे डॉक्टर असोशिएशन यांनी मेडीकल कॅम्प चे आयोजन केले**

दि. ११/०७/२०१९ रोजी उत्तमनगर पोलीस ठाणे येथे ०९/०० वा. ते १२/०० वा. पर्यंत पोलीस ठाणे हद्दीतील उत्तमनगर शिवणे डाक्टरॅ असोशिएशन यांनी मेडीकल कॅम्प चे आयोजन केले होते. सदरवेळी पो.ठाणे हद्दीतील ०८ ते १० डाक्टरॅ उपस्थित होते. उपस्थित तज्ञ डॉक्टर यांचेकडुन पोलीस ठाणे येथील उपस्थित अधिकारी कर्मचारी यांची बी पी ,शुगर ,हिमोग्राम ,ई सी जी व जनरल वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

डॉक्टर यांनी दैनंदिन कामकाज करताना आपण आपल्या आरोग्याची काळजी कोणत्या प्रकारे घेतली पाहिजे , संतुलीत आहार कसा असावा या बाबत मार्गदर्शन करुन व्यायामाचे महत्त्व समजावून सांगितले.

अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकिय तपासणी झालेनंतर आम्ही बैठकीदरम्यान उपस्थित डॉक्टर यांना पुणे पोलीस आयुक्तालयाचे वतीने नव्याने सुरु करण्यात आलेल्या हेल्पलाईन बाबत थोडक्यात माहिती दिली. हॉस्पिटल मधिल तसेच समोरिल रस्त्याकडील हालचाली टिपण्याकरिता सीसीटीव्ही लावणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत.तसेच उपस्थितांनी हद्दीतील वाहतुक समस्या याबाबत शंका उपस्थित केली असता तिचे निरसन केले. जखमी अगर संशयित इसम उपचाराकरीता आपल्या हॉस्पिटल मध्ये आल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे कळविण्यात यावे असे आवाहन करण्यात आले आहे.पोलीस आयुक्तालयामध्ये स्थापण करण्यात आलेले भरोसा सेल बाबत माहिती देवुन भरोसा सेलचे कार्ड वाटप करण्यात आले आहे.